# SBI PEN. ASSN.'S SAMVAD

**स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे यांची गृहपत्रिका**

Price ₹ 3/-

|| स्वधर्मेव मृगेंद्रता ||

# संवाद

***मनामनांचा मेळ जुळावा । द्वेषाचा लवलेश नसावा ।।***
***सादासी प्रतिसाद मिळावा । वाद नको संवाद असावा ।।***

**Vol.- 6 Issue 5 नोव्हेंबर - २०१३ November 2013**


## संपादकीय

सभासदमित्रहो,

'प्रयत्नांती परमेश्वर' हे त्रिकालाबाधित सत्य आहे. म्हणूनच प्रयत्नवादाचा प्रखर पुरस्कार करणाऱ्या समर्थ रामदास स्वामींनी 'यत्न तो देव जाणावा' हा अमूल्य विचार सोप्या शब्दात सांगितला आहे. 'केल्याने होत आहे रे । आधी केलेची पाहिजे ।। या शब्दात समर्थ आपल्याला कर्तव्याची-कर्मयोगाची जाणीव करून देतात. आपण पाहतोच की, माणूस हा धडपडणारा, सतत प्रयत्नशील राहणारा असतो. माणसाचे त्याच्या जन्मापासूनच सतत धडपड प्रयत्न चालू असतात. हे प्रयत्न आतून मिळालेल्या प्रेरणेने होत असतात आणि त्याला यश आणि आनंदाकडे नेतात. पहा ना, जन्माला येताना बाळाला त्याचा श्वास घेण्यासाठी स्वत:च प्रयत्न करावे लागतात. नंतर पालथे पडणे, रांगणे, उभे राहणे, बोलणे, अशा प्रत्येक टप्प्यावर तो स्वत:च प्रयत्न करतो. विद्यार्थीदशेत प्रयत्नपूर्वक मिळवलेले ज्ञान त्याला ध्येयाकडे नेते. तारुण्यातही प्रयत्नांती तो नोकरी-धंदा करतो, मुलांचे शिक्षण, विवाह आदी जबाबदाऱ्या पार पाडतो. पुढे वयाची पन्नाशी त्याला वार्धक्याची अंधुक का होईना चुणूक दाखवू लागते आणि वयाच्या साठीनंतर नोकरीतून निवृत्त होतो तसेच व्यवसायातूनही तो हळूहळू अंग काढून घेतो.

जवळजवळ ९०% ते ९५% स्त्री-पुरुषांचा भौतिक जीवनाचा हाच आराखडा असतो. घरदार, संपत्ती मिळवली, मुले शिकली, स्थिरावली की जीवनाची परिपूर्णता झाली हीच त्यांची धारणा असते. आता, साठीनंतरचे उरलेले आयुष्य बोनस आहे असं समजून ते आरामात मजेत घालवायचे हीच त्यांची इच्छा असते. परंतु शारीरिक व्यथा, मानसिक त्रास ह्यात हा बोनस संपून जातो. मात्र उरलेले ५% लोक स्वत:च्या छंदामध्ये आनंदी राहतात. कोणी भौतिक शास्त्रात शोध लावतात; कोणी संगीत शिकतात; कोणी समाज कार्यात स्वत:ला झोकून देतात. या सर्वांचा उपयोग निश्चितच समाजाला होतो.

परंतु अगदी तुरळक व्यक्ती अशाही असतात की, त्या बाह्य गोष्टींच्या क्षणभंगुर आनंदात न राहता उच्च प्रतीच्या आनंदात सदैव मग्न असतात. काहींना जन्मापासून ही प्रेरणा असते, तर काहीजण मिळालेल्या आध्यात्मिक ज्ञानातून स्वत:च्या अनुभवाने, अभ्यासाने व साधनेने ह्या ज्ञानावर प्रभुत्व प्राप्त करतात आणि त्यायोगे अहंकार, मानअपमान, प्रतिष्ठा ही मनावरची बाह्य ओझी ते प्रयत्नपूर्वक उतरवतात. आलिशान राहणी, गाड्याघोडे ह्यात त्यांना रस नसतो. ते समाजात सामान्य माणसासारखेच राहतात. त्यामुळे असे लोक कोठेही उठून दिसत नाहीत. अथक प्रयत्न, सराव-साधना, पूर्वसूरींकडून मिळालेले मार्गदर्शन यांच्या बळावर त्यांची सदैव आनंदाकडेच वाटचाल चालू असते. अनेकवेळा ते पडले, ठेचकाळले, माघार घ्यावी लागली तरी शेवटी ते सर्वोच्च आनंदाचे परमेश्वरी शिखर गाठतात. त्यांच्याच प्रयत्नाने त्यांचे जीवन पूर्णत्वाला जाते. मित्रहो, आपणा प्रत्येकाला ह्याच दिशेने जायचे आहे, हे सदैव लक्षात ठेवा आणि आत्तापासून त्याचा ध्यास घेऊन मार्गस्थ व्हा. आपल्याही आयुष्यात ती अत्युच्च आनंदाची वेळ-समाधानाचा क्षण लवकरच येईल यात मिळमात्रही शंका नको.

याच महिन्यात भारताचा जगप्रसिद्ध क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरने क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. १८ नोव्हेंबर १९८९ रोजी क्रिकेट विश्वात पदार्पण करून गेल्या २४ वर्षात त्याने अनेक विक्रम प्रस्थापित केले. क्रिकेट खेळातील त्याचे योगदान अलौकिक आहे. सचिनचे त्याबद्दल हार्दिक अभिनंदन. विशेष म्हणजे सचिनची बालपणापासूनची क्रिकेटमधील जडणघडण, खेळातील बारकावे याबाबतीत त्याला मार्गदर्शन करणारे, आदरणीय श्री. रमाकांत आचरेकर हे आपल्या असोसिएशनचे सभासद आहेत. या निमित्ताने त्यांचेही अभिनंदन. या गुरु-शिष्यांचा आम्हाला अभिमान वाटतो.

**- शरद शिंगवेकर**

स्टेट बँक कर्मचाऱ्यांच्या अनेक यशस्वी गृहप्रकल्पानंतर

# मेसर्स सुरेश घंगाळे अँड असोसिएट्स्
# योगेश कन्स्ट्रक्शन्स आणि
# राजयोग कन्स्ट्रक्शन्स अॅन्ड डेव्हलपर्स

सादर करीत आहे

## सुसगांव (पाषाण-सुस लिंक रोडवर)

सर्व्हेनं. २१४/३

दोन बेडरूमचे सुसज्ज, अत्याधुनिक फ्लॅटचा प्रोजेक्ट

एरिया ९०० ते १००० स्क्वे. फूट - दर रु.४२००/- प्रति स्क्वे.फूट

बुकींग सुरु

सुरुवातीची रक्कम रु.३ ते ५ लाख - चेक/डी.डी.ने

५ गुंठे ते २० गुंठ्याचे फार्महाऊस प्लॉट

(नांव नोंदणी सुरु)

संपर्क

९३७१०१४८०७ / ७५०७८०६००७

ऑफिस -
स.नं.९१/१
स्टेट बँक कॉलनी, रायगड बिल्डींग,
उत्सव हॉल जवळ, पौडरोड,
कोथरूड, पुणे - ४११०३८
वेळ - संध्या. ४ ते ८.००
रविवार व सुट्टीचे दिवस
सकाळी ११ ते १
फोन नं.०२०-२५३८०५०६

ऑफिस -
जी-१५,शांतीकुंज बिल्डींग,
जी.पी.ओ. समोर,
साधु वासवानी रोड, कॅम्प,
पुणे - ४११००१
फोन नं.०२०-२६१२२०२१

# युनिट वार्ता

## कोल्हापूर युनिट :

आपल्या कोल्हापूर युनिटने कोजागिरी पौर्णिमेच्यानिमित्ताने दि.२६ ऑक्टोबर २०१३ रोजी येथील हुतात्मा गार्डनमध्ये आपले सभासद व त्यांच्या कुटुंबीयांसाठी एक स्नेह-मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्यास ८० जणांची लक्षणीय उपस्थिती होती. प्रारंभी युनिटचे अध्यक्ष श्री. रत्नाकर कुलकर्णी यांनी उपस्थितांचे स्वागत केल्यावर सभासदांनी उत्स्फूर्तपणे मनोरंजनात्मक कार्यक्रमात भाग घेऊन आपआपली कला सादर केली.

सौ.मेधा पोंक्षे व सौ.सुनीता सलंत्री यांनी विविध गाणी सादर केली. त्यानंतर वयोवृद्ध सहसभासद सौ.शकुंतला बेलेकर यांनी जुन्या पद्धतीचे विनोदी 'उखाणे' सादर करून सर्वांची दाद मिळवली. श्री.रविंद्र पंडित यांनी नुकतेच दिवंगत झालेले सुप्रसिद्ध गायक 'मन्ना डे' यांची गाजलेली कांही निवडक गाणी गाऊन त्यांना आदरांजली अर्पण केली. श्री.जगदीश दिवाण यांनी विडंबन गीत सादर करून, तसेच श्री.पी.आर,सांगावकर यांनी काव्यवाचन व श्री.गजानन जोशी यांनी विनोदी चुटके सांगून कार्यक्रमात रंगत आणली.

श्री.शांताराम पन्हाळकर यांनी गणिती पद्धतीने कोणत्याही व्यक्तीच्या जवळील चलनी नोटांच्या नंबरांमधील पहिले ३-४ अंक फळ्यावर मांडून त्या व्यक्तीचे वय अचूक कसे काढायचे/ओळखायचे ह्याचे प्रात्यक्षिक दाखवून सर्वांना अचंबित केले.

श्री.पांडुरंग बोरकर यांनी तोंडाने बासरीवादन केलेच पण नाकानेसुद्धा बासरी वाजवून सर्वांना थक्क करून सोडले. तसेच सौ.पद्मा बेकिनकर यांनी सौ.अरुंधती मराठे व सौ.नंदिनी पंढरपुरे यांच्या साथीने आकाशवाणीवरील निवेदिका कशाप्रकारे महिलांसाठीचे कार्यक्रम सादर करेल याची नक्कल करून स्वलिखित विनोदी प्रसंगाचे संवाद सादर करून सर्वांना हसवत ठेवले. नंतर महिलांसाठी शब्दकोड्यांची हलकी-फुलकी स्पर्धाही आयोजित केली होती. या विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमास माइकची सोय श्री. एस. पी. कुलकर्णी यांनी केल्यामुळे सर्वांना या संपूर्ण कार्यक्रमाचा आस्वाद मनसोक्त घेता आला. कार्यक्रमाचे शेवटी अल्पोपहार व मसाला दुग्धपानाचा आस्वाद घेतल्यावर आणि श्री.विवेक नाडगौडा यांनी आभार प्रदर्शन केल्यावर कार्यक्रमाची सांगता झाली.

- विवेक नाडगौडा, खजिनदार

(कोल्हापूर युनिट)

*************

## कै.श्री.मुकुल ऊर्फ 'बच्चा' चितळे - श्रद्धांजली

दि.१५ सप्टेंबर २०१३ रोजी माझा परमस्नेही कै.श्री.मुकुल चितळे याचे दु:खद निधन झाले. तो सर्व मित्र-परिवारात 'बच्चा' या नावानेच ओळखला जायचा. त्याच्याबद्दल सांगण्यासारख्या खूपच चांगल्या गोष्टी आहेत. मुकुलचे व्यक्तिमत्व अतिशय देखणे व उमदे होते. तो सदैव हसरा व प्रसन्न असायचा. त्याच्या प्रसन्न असण्याने समोरच्याला उर्जा मिळत असे. त्याचे खास वैशिष्ठ्य म्हणजे मित्रमंडळीत/मैफिलीत विनोद सांगणे. विनोद सांगण्याची त्याची हातोटी विलक्षण होती. विनोद हा त्याच्या वृत्तीतच होता. त्याचे हस्ताक्षरही अतिशय सुरेख होते. त्याच्या लाघवी स्वभावाने त्याने अनेक माणसे (बँकेतील व बाहेरील समाजातील) जोडली होती. त्याच्या या स्वभावामुळे माझा व माझ्यामुळे त्याचा मित्र-परिवार वाढत गेला.

गेली १५ वर्षे सर्वत्र आमची दोघांची जोडी असायची. लोकांनाही वर्षानुवर्ष आम्हा दोघांना एकत्र पहायची इतकी सवय झाली होती की, एखादे वेळेस दोघांपैकी एकचजण असेल तर दुसरा कां नाही? कोठे आहे?- अशी विचारणा व्हायची. 'बच्चा' अजातशत्रू होता. मी गमतीने त्याला सुयोधन म्हणायचो, कारण त्याला सर्वांमध्ये चांगलेच दिसायचे. आयुष्यभर असंख्य लोकांच्या जीवनात त्याने आनंदाचे क्षण मुक्तहस्ते उधळले. तो एक 'आनंदयात्री'च होता व माझा जिवाभावाचा मित्र होता. तो नेहमी सकारात्मक विचार करायचा. त्यामुळे त्याच्या सान्निध्यात येणारेपण सकारात्मक विचारसरणीचे व्हायचे. त्याच्या सर्व क्षेत्रातील दिग्गजांशी तसेच अन्य लोकांशी भरपूर ओळखी होत्या. त्याच्या जिंदादिल स्वभावामुळे तो जनमानसात खूपच लोकप्रिय होता. त्याचा सहवास सर्वांना हवाहवासा वाटायचा. सर्व्हिसमध्ये असतांना स्टेट बँक ऑफिसर्स असोसिएशनमध्ये, तसेच निवृत्त झाल्यावरसुद्धा तो पेन्शनर्स असोसिएशनच्या कामात सक्रिय कार्यकर्ता होता. बँकेची त्याने ३७ वर्षे निष्ठेने, निष्कलंक तसेच ग्राहकाभिमुख सेवा करून मुदतपूर्व निवृत्ती (VRS) घेतली. या जगात येणाऱ्याला कधी ना कधी एक दिवस जावच लागतं. पण चितळेचं जाणं खूप चटका लाऊन गेलय. चितळे, तू गेलास तरी तुझ्या आठवणी क्षणोक्षणी आमच्या मनात जागत रहातील. तुझा कधीही विसर न व्हावा व तुझ्या आत्म्यास चिरशांती लाभो हीच ईशचरणी प्रार्थना.

तुझ्या पवित्र स्मृतीस माझी व तुझ्या सर्व मित्रांची भावपूर्ण श्रद्धांजली. -

**प्रकाश जांदे, डोंबिवली**

Mobile : 09833041246

***************

व्यक्तिविशेष

## सर्जनशील श्री.प्रभाकर गोखले यांची नवनिर्मिती बॅटरीवर चालणारी सायकल

आपले अंबरनाथ येथील एक सभासद श्री.प्रभाकर विष्णु गोखले यांनी २००१ साली व्ही.आर.एस. घेतली असली तरी ते घरी स्वस्थ न बसता सतत नाविन्याचा ध्यास घेत प्रयोग करत असतात. सामान्यजनांचे नेहमीचे आयुष्य कांही प्रमाणात सुखकर कसे होईल याची काळजी वाहत असतात. याचे प्रत्यंतर म्हणजे नुकतीच त्यांनी बनवलेली बॅटरीवर चालणारी 'अर्धस्वयंचलित' (म्हणजे Semi-automatic) सायकल. यासाठी त्यांना गोविंदराज, मनोज बिनानी व राजन जोशी यांची खूप मदत झाली असे ते आवर्जून सांगतात. त्यांच्या या शोधाविषयी एक परिचय लेख दि.७ नोव्हेंबर २०१३ च्या 'लोकसत्ता' या मराठी वृत्तपत्रात श्री.प्रशांत मोरे यांनी लिहिला आहे. 'पर्यावरण, पैसा आणि आरोग्य अशा तिन्ही दृष्टीने सध्या काळाची नितांत गरज असूनही कालबाह्य ठरू लागलेली सायकल या नव्या सुविधेमुळे पुन्हा लोकप्रिय होईल' असा आशावाद श्री.मोरे यांनी या लेखात व्यक्त केला आहे.

कशी आहे ही सायकल? श्री.गोखले यांनी साध्या सायकलला प्रत्येकी १२ वॅटच्या दोन बॅटऱ्यांच्या सहाय्याने अर्धस्वयंचलित केले आहे. या दोन बॅटऱ्यांमुळे त्यांना अर्ध्या तासात नऊ किलोमीटर अंतर कापता आले. विशेष म्हणजे आवश्यक तेव्हाच बॅटरी वापरण्याची सोय या सायकलमध्ये आहे. केवळ चढ चढून जाण्यासाठी बॅटरीचा वापर केल्यास ती १८ ते २० किलोमीटर अंतर सहज कापू शकते. अर्थात अधिक क्षमतेची (वॅटची) बॅटरी असेल तर सायकल अधिक अंतर कापू शकेल. शहरांतर्गत प्रवासासाठी ही सायकल अतिशय उपयुक्त ठरू शकेल असे ते म्हणतात. सध्या सायकल सर्वसाधारणपणे चार हजार रुपयांना मिळते. तिला 'अर्धस्वयंचलित' करण्यास अंदाजे आठ हजार खर्च येतो. तरीही स्वयंचलित दुचाकीच्या (स्कूटरच्या) तुलनेत ती कित्तीतरी स्वस्त आहे. एका विज्ञान प्रदर्शनात त्यांनी अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी बनवलेली बॅटरीवर चालणारी सायकल पाहिली. मात्र त्यासाठी विद्यार्थ्यांना आलेला खर्च खूप होता.

पेट्रोल दिवसेंदिवस महाग होत चालले असल्याने पुन्हा एकदा सायकलचे महत्व लोकांना पटू लागले आहे. नेहमीच्या साध्या सायकलचे रूपांतर अर्धस्वयंचलित सायकलमधे केल्यास पेट्रोलचे पैसे तर वाचतीलच; शिवाय प्रदूषणही होणार नाही. श्री.गोखले येवढ्यावरच समाधानी नाहीत तर त्यांना ही सायकल 'सौरऊर्जेवर चालवायची आहे व त्या दृष्टीने त्यांचे प्रयत्न सुरू आहेत.

खगोलशास्त्र हा त्यांचा आणखी एक आवडीचा विषय. ग्रह-ताऱ्यांच्या निरनिराळ्या खगोलीय अवस्थांच्या छोट्या प्रतिकृती त्यांनी तयार केल्या आहेत व त्याद्वारे विद्यार्थ्यांना हा विषय समजून घेणे सोपे जाते. गेली २५ वर्षाहून अधिक काळ कल्याण येथील 'आकाश मित्र मंडळ' या खगोलविषयक अभ्यासकांच्या संस्थेचे ते क्रियाशील सभासद आहेत. याशिवाय दोन्ही हातांच्या बोटांच्या सहाय्याने छायाप्रकाशाच्या माध्यमातून निरनिराळ्या आकृत्या दाखवून ते मुलांचे मनोरंजनही करतात.

अशा या आपल्या सदैव कार्यरत असलेल्या, नाविन्याचा ध्यास घेतलेल्या सभासदमित्राचे कौतुक करावे तेव्हढे थोडेच आहे. श्री.प्रभाकर गोखले यांच्या संशोधक वृत्तीला सादर प्रणाम व त्यांना त्यांच्या पुढील वाटचालीस मन:पूर्वक शुभेच्छा !

– सेक्रेटरी

### अनुकरणीय

आपले कोल्हापूर येथील सभासद कै.मनोहर पांडुरंग राजाध्यक्ष यांचे २६ ऑगस्ट २०१३ रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पत्नि श्रीमती मृणालताईं यांनी पतिच्या इच्छेनुसार कै.राजाध्यक्ष यांचे नेत्रदान करून सामाजिक बांधिलकीचा प्रत्यय आणून दिला. याबद्दल कै.मनोहर राजाध्यक्ष व त्यांच्या पत्नि श्रीमती मृणालताई या अभिनंदनास पात्र आहेत.

तसेच पुणे येथील एक सभासद कै.नंदकुमार देव यांचे दि.१२ सप्टेंबर २०१३ रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पत्नि श्रीमती नंदिनी देव व त्यांच्या कुटुंबीयांनी कै.देव यांच्या इच्छेनुसार मृत्युपश्चात पुणे येथील ससून हॉस्पिटल येथे देहदान केले. या दोनही सभासदांच्या व त्यांच्या कुटुंबीयांच्या समाजोपयोगी व अनुकरणीय कृतीबद्दल असोसिएशनतर्फे हार्दिक अभिनंदन !

– सेक्रेटरी

### 'NEWS' WORTH NOTING

From 1st January 2014 no Bank will accept anything written on note. You cannot deposit that note in Bank. As per RBI guidelines, because of writing on Indian currency notes, Indian Govt loses Rs 2,638 crores each year, so please don't write anything on currency note as they can't be used for STD transactions - e.g. we can't find written notes in ATM. When will we learn to value & respect our own currency ? Have you seen a Dollar Bill or a Pound with anything written on it ?

contributedby-*Shri.K.V.Shastri,* Visakhapatnam

## Bloated ego

There was a pot maker in a small village. Once, during Durga Pooja, he made plenty of idols, loaded them onto the back of his donkey, and walked to the town to sell them. On the way, people would see the idols and fold their hands. The donkey was nonplussed, but after a while, began standing still, proudly, whenever people would fold their hands. This went on till the pot maker reached the town. By the evening, the pot maker had sold all his idols and began his trip back to the village. Whenever someone would pass them, the donkey would stand still proudly, expecting people to wish him, but this did not happen. The donkey kept stopping and wouldn't understand why no one was paying obeisance to him. The pot maker was irritated for he couldn't understand the strange behavior of his donkey. After trying to cajole and force him to move, the man began beating up the donkey.

This story applies to all those who carry bloated egos. We are only carriers, not the object that we are carrying. Responsibilities are gifted to all of us by God, but we can only carry those for some time. Why then, have ego for luggage?

***- Anonymous***

The above is a reproduction from Speaking Tree dated Sep 29, 2013 of Times of India. I realize that, including me, many of us carry bloated egos. Some small - some huge! When in service, 'I am a MANAGER, 'I am a SCALE….' was a constant refrain in the head. 'X is MY ASSISTANT!', 'I sanctioned RS ………to SO AND SO ! And the feeling of 'I am the FATHER!' within the family. All the above gave me a God given right to be superior to my fellow beings. And consequently I expected obeisance from them.

Did this feeling go away once out of the chair? Once one retired? Of course not ! I still expected/expect the same know-towing from every one.

The British went out of India way back before I even joined the Bank. But I expected everyone to call me 'Sir'. 'I AM THE MOST RESPECTED.' This feeling of ego brings along to all of us corresponding sorrow. For one is recognized for the responsibility held and not the personage. And consequently, once out of the chair, each one of us is just an ordinary person, like anyone else.

May be, if I were to lose my ego and let go my luggage I would be so much happier ! A little bit of humility and a dose of self realization that we are all the same, each one has a different ability and each one has a different responsibility could make our lives so much more fulfilling.

So I have decided that I would rather be a human being than the donkey in the story above. Better late than never! What about you?

**Chandru Sharma, Thane**
(M) 09820304320

*************************************

### अभिनंदनीय

आपले पुणे येथील सभासद श्री.के.एन.सबनीस यांची सुकन्या कु.अमृता ही C.A. परीक्षा उत्तम गुण मिळवून पास झाली. C.A. करता करता तिने M.Com. ही पदवीसुद्धा प्राप्त केली. तिला गाणे व जोडचित्राची पण आवड आहे. सध्या ती सारस्वत बँकेच्या पुणे झोनल ऑफिसमध्ये Dy.Manager (Credit) या पदावर कार्यरत आहे. चि.अमृताला तिच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी असोसिएशनतर्फे हार्दिक शुभेच्छा !

– सेक्रेटरी

### स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन
### डोंबिवली विभाग

डोंबिवली विभागातील (डोंबिवली, कल्याण व बदलापूर येथील) सर्व पेन्शनर्स व फॅमिली पेन्शनर्सचा मेळावा शुक्रवार **दि.२० डिसेंबर २०१३ रोजी सायंकाळी ५ वाजता आपल्या टिळकनगर, डोंबिवली (पूर्व) शाखेत** आयोजित केला आहे. आपले सर्कलचे अध्यक्ष श्री.व्ही.एम.गोखले तसेच मुंबई झोनल सब् सेंटरचे अध्यक्ष श्री.एस.बी.गोखले हे सभेस संबोधित करून चालू घडामोडींविषयी माहिती सांगणार आहेत. तरी डोंबिवली विभागातील सर्व पेन्शनर्स व फॅमिली पेन्शनर्सनी या मेळाव्यास उपस्थित रहावे ही विनंती.

**सुभाष आगरकर**
ऑर्गनाईझिंग सेक्रेटरी

*SPECIAL FESTIVAL OFFER,*

**FOR ALL YOUR INTERNATIONAL COURIER NEEDS**

***Universal Courier***

*We bring the universe at your doorstep*

*SINCE 1992*

*IATA CERTIFIED*

***An Organization run by SBI pensioners***

***Mr. J. N. Sethia & Mr. P. W. Kamerkar's next generation***

**Offering wide range of services for worldwide such as Express Courier, Airfreight Door to Door as well as Airport to Airport, Import/ Export custom clearance & free pick-ups from anywhere in Mumbai. Expertise in dealing with Foodstuff & personal effect shipments for worldwide.**

*Specialize for: UK, Dubai, USA, CANADA, and AUSTRALIA & AFRICA.*

***Contact: Mr.Biren Sethia - 9820338233, Mr.Mahesh Kamerkar - 9820316152, Pushpendra Tiwari -9870198118/9321026630 & Kajal - 8879140670***

**Landline: 022 - 26821072/74**

E-mail: sales@ucglobal.com & mahesh.k@ucglobal.com

Website: www.ucglobal.com

***HO:** 1 & 2 Skylark, Next to Kamgar Kalyan Bhawan, Near BMC office, Azad Road, Andheri East, Mumbai – 400069*

## Congratulations !

Daughter of our member Shri.Anant S.Kalkar from Mumbai, Mrs.Avita Vinay Kulkarni has been honoured with Ph.D in "Human behavioural Management through Shreemad Dasbodh" from 'Shri Jagdishprasad Jhabarmal Tibrewala University. JhunJhunu, Rajasthan. Congratulations Dr. (Mrs) Avita !

- Secretary

## विनोद

पोलीस - बँकेत चोरी केव्हा झाली?

बँक मॅनेजर - मी तेव्हा बाहेर होतो.

पोलीस - साहेब, तुम्ही कोठे गेला होता?

बँक मॅनेजर - बँकेत पैसे ठेवल्याने सुरक्षित तर रहातात पण त्याच्यात व्याजाची भर पडून वाढत राहतात, हे बाजारात जनतेला सांगायला मी बाहेर गेलो होतो.

०६८/१३ - **अशोक बुटाला,** पवई

भ्रमणध्वनी - ९८३३१४८०४

## विनोद

सून - सासुबाई तुमचे सर्व दागिने मला देऊन टाका.

सासू - ठीक आहे! पण मग मी काय घालू?

सून - तुम्ही रोज सूर्यनमस्कार घालीत जा. त्यामुळे प्रकृती छान राहते आणि प्रकृती छान असणे हाच मोठा दागिना आहे.

******

श्रीमंत व्यक्ती डॉक्टरांना म्हणाली, तुम्ही तुमचं म्हणणं खरं करून दाखवलंत. तुम्ही सांगितले, दोन महिन्यात तुम्ही बरे होऊन माझेकडे चालत याल. झालेही तसेच बघा.''

डॉक्टर - ''मला खूपच बरे वाटले.''

गृहस्थ - ''बरे वाटणारच. कारण तुमचे बिल देण्यासाठी मला माझी गाडी विकावी लागली.''

०६७/१३ - **पु. नि. देशपांडे,** अमरावती

भ्रमणध्वनी - ९७६४९७४४२२

## List of Donors who have given Donations during the period from January 2013 to June 2013

(Please refer earlier List published in Samvad for the month of January 2013)

**************************************************

| NAME | AMOUNT |
|---|---|
| MR.M.PRABHU | 19089 |
| MR.M.S.DHABEKAR | 11000 |
| MR.MORESHWAR GODBOLE | 10000 |
| MR.P.K.MANIK | 10000 |
| MR.K.V.MUJUMDAR | 10000 |
| MR.DINESH KAMAT | 7500 |
| MR.MOIN QUAZI | 7500 |
| MR.K.K.KULKARNI | 5301 |
| MR.A.V.PUSADKAR | 5101 |
| A WELLWISHER | 5001 |
| MR.SOLI J.BATHENA | 5001 |
| MR.HARISHCHANDRA GUNDAWAR | 5001 |
| MR.N.G.JOSHI | 5001 |
| MR.NARENDRA JOSHI | 5001 |
| MR.SHAMKANT OKE | 5001 |
| MR.M.S.PALSAPURE | 5001 |
| MR.V.V.PURAO | 5001 |
| MR.MILIND UMALKAR | 5001 |
| MR.A.P.VALOKAR | 5001 |
| MR.S.M.AGREKAR | 5000 |
| MR.SHAMDASRAO AMBEKAR | 5000 |
| MR.DEEPAK APTE | 5000 |
| MR.M.V.BHAGWAT | 5000 |
| MR.SHYAMSUNDER DALBHIDE | 5000 |
| MR.G.B.DARUNDE | 5000 |
| MR.R.K.DEKATE | 5000 |
| MR.ASHOK DESAI | 5000 |
| MR.SUBHASH G.DESAI | 5000 |
| MR.A.G.DESHPANDE | 5000 |
| MR.RAMESH DHAKATE | 5000 |
| MR.KUMAR DHOKE | 5000 |
| MR.RAJA DHOLE | 5000 |
| MR.PRABHU H.FULZELE | 5000 |
| MRS.NEELA GADGIL | 5000 |
| MR.RAHUL GAJBHIYE | 5000 |
| MR.KISHOR HADE | 5000 |
| MR.DEORAO HEDAOO | 5000 |
| MR.SAMADHAN INGLE | 5000 |
| SMT.RESHMA JADHAV | 5000 |
| MR.VIJAY M.JAGDALE | 5000 |
| JOHNSON & JOHNSON | 5000 |
| MR.V.W.JUNANKAR | 5000 |
| MR.JANARDAN KADU | 5000 |
| MR.SHRIKANT KASHIKAR | 5000 |
| MR.BHALCHANDRA KHAPRE | 5000 |
| MR.SUDHIR KHARBADE | 5000 |
| MRS.PALLAVI V.KHARE | 5000 |
| MR.N.P.KOLHARKAR | 5000 |
| MR.VIJAY KULKARNI | 5000 |
| MR.PRAKASH KUNDLE | 5000 |
| MR.LOWJI LAKDAWALA | 5000 |
| MR.MANOHAR MADHUGIRI | 5000 |
| MR.S.M.MAHADANI | 5000 |
| MR.DATTATRAY MARATHE | 5000 |
| MR.N.G.MORE | 5000 |
| SMT.SHALINI S.PANDIT | 5000 |
| R0DA PATEL | 5000 |
| MR.MANGESH PATKAR | 5000 |
| MR.ARUN PHALTANKAR | 5000 |
| MR.ANIL PIPLAPURE | 5000 |
| MR.SHRINIVASAN RAO | 5000 |
| MRS.SHANTA TAKSANDE | 5000 |
| MR.ARUN BIDWAI | 3000 |
| MR.ASHOK P.JOSHI | 3000 |
| MR.MANIK MESHRAM | 3000 |
| MR.N.G.PARKHI | 3000 |
| MRS.ANURADHA PHADNAVIS | 3000 |
| MR.DEVIDAS SHASHITAL | 3000 |
| MR.A.G.PHADKE | 2751 |
| MR.S.M.DHARADHAR | 2501 |
| MRS.NANDA S.GOKHALE | 2501 |
| MR.NILKANTH PARATE | 2501 |
| MR.SATISH PHANSALKAR | 2501 |
| MR.J.B.PUSALKAR | 2501 |
| MR.R.S.RAJIWADEKAR | 2501 |
| MR.GHANASHYAM SHAH | 2501 |
| SMT.DEVYANI SHETH | 2501 |
| MR.R.R.VARSALE | 2501 |
| MR.YADAV BHOGAONKAR | 2500 |
| MRS.SUPRIYA S.BHUSARI | 2500 |
| MR.ARUN DAS | 2500 |
| MR.S.R.KARANDIKAR | 2500 |
| MR.K.K.NAKHATE | 2500 |
| ZONAL OFFICE,MUMBAI AGM | 2500 |
| MR.K.N.KURIL | 2251 |
| MR.PHIROZE KABRAJI | 2222 |
| MR.ANANT DAHIGAONKAR | 2001 |
| MR.SHRIKRISHNA M.KULKARNI | 2001 |
| MR.PRABHAKAR PADGAONKAR | 2001 |
| MR.P.B.BHENDE | 2000 |
| MR.DATTATRAY DEGWEKAR | 2000 |
| MR.SUBHASH DESHKAR | 2000 |
| MR.DILIP DESHPANDE | 2000 |
| MR.SANJEEV DESHPANDE | 2000 |
| SMT.NIRMALA JOSHI | 2000 |
| MR.D.S.NANNAWARE | 2000 |
| MR.VISHWAS PHADNIS | 2000 |
| SMT.INDIRA RAJGOPALAN | 2000 |
| MR.ARUN RINGE | 2000 |

| | |
|---|---|
| MR.ROHIT K.SAHA | 2000 |
| MR.VINAY S.SATOKAR | 2000 |
| SMT.KAVITA TRILOKEKAR | 2000 |
| MR.P.M.GARKHEDKAR | 1650 |
| MR.V.D.GUNDAPWAR | 1501 |
| GURJAR,RAJE,PATANKAR | 1500 |
| MR.V.K.HERLEKAR | 1500 |
| MR.UDAY JOSHI | 1500 |
| MR.M.KUMBHAR | 1500 |
| MR.G.N.MOHDARKAR | 1500 |
| MR.M.K.BAPAT | 1111 |
| MR.SANJAY BHAWALKAR | 1111 |
| MR.DILIP BRAHMAKSHATRIYA | 1111 |
| MRS.MADHURI C.GADGE | 1111 |
| MR.CHANDRAKANT GADGE | 1111 |
| MR.R.S.GURJAR | 1111 |
| MR.ASARAM KHANDARE | 1111 |
| MR.NANDKUMAR MAHAJAN | 1111 |
| MR.M.D.PALKAR | 1111 |
| MR.R.PATNE | 1111 |
| MR.CHANDRASHEKHAR PIMPLE | 1111 |
| MR.VIJAY K.RAHATE | 1111 |
| MR.SHRAD CHAUBAL | 1101 |
| MR.HEMANT KULKARNI | 1101 |
| MR.VISHWANATH M.JOSHI | 1100 |
| MR.G.B.KUMBHARE | 1100 |
| SMT.SHUBHADA PAWAR | 1100 |
| MR.PRAKASH PINGLE | 1100 |
| MR.RAVINDRA VERENKAR | 1005 |
| MR.M.K.AMTE | 1001 |
| MR.P.R.BANSODE | 1001 |
| MR.D.H.BHAGWAGAR | 1001 |
| MR.RAMESHKUMAR BUDHWANI | 1001 |
| MR.S.A.BURDE | 1001 |
| MR.K.B.DAYARAMANI | 1001 |
| MR.B.G.DESAI | 1001 |
| MR.K.J.JUGWANI | 1001 |
| MR.J.C.KHEKALE | 1001 |
| MR.CHANDRASHEKHAR KIRTIKAR | 1001 |
| MR.MOHAN KRIPLANI | 1001 |
| MR.SURESH KULKARNI(NASHIK) | 1001 |
| MR.A.K.KULKARNI | 1001 |
| MR.NANIKRAM LALWANI | 1001 |
| MR.T.R.MAKODE | 1001 |
| MR.GAJANAN MOHITE | 1001 |
| MR.N.K.NERKAR | 1001 |
| MR.NITYANAND PANDIT | 1001 |
| MR.ANIL PIMPLAPURE | 1001 |
| MR.K.S.POPAT | 1001 |
| MR.N.Z.RAUT | 1001 |
| SMT.INA TALPADE | 1001 |
| MR.PRAKASH A.TOTRE | 1001 |
| A WELLWISHER | 1000 |
| MR.SURESH BAKRE | 1000 |
| MR.T.BALKRISHNAN | 1000 |
| SMT.VIMALA BALSUBRAMANIAM | 1000 |
| MR.VILAS BARVE | 1000 |
| MR.NARESH BHADRA | 1000 |
| MR.RAMCHANDRA BHANGE | 1000 |
| MR.R.V.CHARI | 1000 |
| MR.PRAMOD CHATE | 1000 |
| MR.B.K.CHAWAN | 1000 |
| SMT.SUNANDA CHIKADE | 1000 |
| MR.LAXMAN N.CHOPDE | 1000 |
| MR.AVINASH L.DANI | 1000 |
| SMT.VIDYA DATE | 1000 |
| MR.SHANTARAM DESHPANDE | 1000 |
| MR.SANJAY C.DESHPANDE | 1000 |
| MR.ANIL DEWALWAR | 1000 |
| SMT.R.DHARAMPURIA | 1000 |
| MR.K.K.DHOLABHAI | 1000 |
| MR.MADHUKAR K.DIXIT | 1000 |
| MR.G.DORAIRAJ | 1000 |
| MR.MORESHWAR DUSSAWAR | 1000 |
| MR.PRADEEP FADNAVIS | 1000 |
| MR.J.FERNANDES | 1000 |
| SMT.VARSHA S.JOSHI | 1000 |
| MR.D.K.KALE | 1000 |
| MR.DILIP P.KHADSON | 1000 |
| MR.M.T.KHANAPURKAR | 1000 |
| SMT.MEGHAMALA KHARDE | 1000 |
| MR.SHARAD P.KITKARE | 1000 |
| MR.M.K.KOLHATKAR | 1000 |
| MR.Y.B.MALANKAR | 1000 |
| MR.ANAND V.NAGRAJ | 1000 |
| MR.V.N.NARI | 1000 |
| MR.MANGESH NAVSALKAR | 1000 |
| MR.VINOD V.PANDE | 1000 |
| MR.BHAVESH PATHRABE | 1000 |
| MR.DEEPAK PATTALWAR | 1000 |
| MR.G.J.PENDHARI | 1000 |
| SMT.INDUKALA POTDAR | 1000 |
| MR.S.RAGHURAMAN | 1000 |
| MR.RAMDAS RAI | 1000 |
| MR.K.P.M.RAJAN | 1000 |
| MR.ARUN R.REGE | 1000 |
| MR.PRAMOD SAKHARE | 1000 |
| SMT.MEENA SHEVADE | 1000 |
| MR.SUDHIR S.SHIRSATH | 1000 |
| MR.P.B.THAKUR | 1000 |
| MR.SHRINIWAS TIKEKAR | 1000 |
| MR.N.S.VEDAK | 1000 |
| MR.GOPAL MULE | 751 |
| MR.G.G.GOKHALE | 720 |
| MR.S.V.PAI BIR | 601 |
| MR.S.S.KADGAONKAR | 600 |
| MR.SATISH KULKARNI | 600 |
| MR.SHAMSUNDAR MORESHWAR | 575 |
| MR.ANANT BHADKAMBA | 510 |
| A WELLWISHER | 501 |

| | |
|---|---|
| A WELLWISHER | 501 |
| SMT.SUNITA DHOND | 501 |
| MR.VASANT KARAMBELKAR | 501 |
| MR.KALPESH KULKARNI | 501 |
| MR.PRAFUL MASTAKAR | 501 |
| MR.V.R.PANDIT | 501 |
| SMT.GIRIJA PARVATE/VELANKAR | 501 |
| SMT.SHAMA PITALE | 501 |
| MR.N.RAMCHANDRAN | 501 |
| SMT.M.M.TOTRE | 501 |
| MR.S.G.USGAONKAR | 501 |
| MR.C.B.AMBEKAR | 500 |
| MR.MILIND APTE | 500 |
| MR.A.D.BAJAJ | 500 |
| MR.A.D.BAJAJ | 500 |
| MR.V.R.BAVISKAR | 500 |
| MR.D.R.BAVISKAR | 500 |
| MR.S.B.BHAVSAR | 500 |
| MR.GOPAL BUNDE | 500 |
| MR.GOVIND CHITTE | 500 |
| MRS.IVONE M.D'SOUZA | 500 |
| MR.B.S.DANGE | 500 |
| MR.A.V.DESHMUKH | 500 |
| MR.Y.T.DESHMUKH | 500 |
| MR.RATAN DHUME | 500 |
| SMT.MONICA FERNANDES | 500 |
| MR.& MRS.FREITAS | 500 |
| MR.ANIL GADKARI | 500 |
| MR.M.G.GANGAL | 500 |
| MR.ARVIND GOKHALE | 500 |
| MR.R.T.JATALE | 500 |
| MR.A.K.JOSHI(JAMNER) | 500 |
| MR.S.B.JOSHI | 500 |
| MR.PRAKASH KALE | 500 |
| MR.A.B.KARNIK | 500 |
| SMT.USHA KHANVILKAR | 500 |
| MR.G.L.LALWANI | 500 |
| MR.V.G.MATHURE | 500 |
| MR.N.N.MISTRY | 500 |
| MR.U.S.NARKHEDE | 500 |
| SMT.SUMANGAL PARANJPE | 500 |
| MR.S.K.PATIL | 500 |
| MR.S.M.PATIL | 500 |
| MR.S.B.PATIL | 500 |
| MR.PHATAK (PUNE) | 500 |
| MR.M.V.PRABHU | 500 |
| MR.V.M.PRABHUDESAI | 500 |
| MR.V.K.RAHA | 500 |
| MR.R.B.RANE | 500 |
| MRS.ELSA SANTOS | 500 |
| SMT.DOLLY SASSANI | 500 |
| MR.R.B.SAVADE | 500 |
| SMT.VASUNDHARA SAVE | 500 |
| MR.SURESH W.SAWANT | 500 |
| MR.S.H.TAPADIA | 500 |
| MR.B.R.TAYADE | 500 |
| MR.A.B.THORAT | 500 |
| MR.ANIL M.TIKEKAR | 500 |
| MR.C.C.G.PAI | 300 |
| MR.G.V.SIRSAT | 300 |
| MR.HARSHAD MODI | 251 |
| MRS.SUSHILA MODI | 251 |
| MR.VINAYAK PELAPKAR | 251 |
| MR.A.D.BUTALA | 250 |
| MR.K.V.GADGIL | 250 |
| MR.P.KAMKAR | 250 |
| MR.RAMCHANDRA BONDALKAR | 210 |
| MR.SURESH KAMULKAR | 205 |
| MR.B.V.DESHPANDE | 201 |
| A WELLWISHER | 200 |
| MR.SUBHASH AMONKAR | 200 |
| MR.A.ANTAO | 200 |
| MR.A.D.BARTAKKE | 200 |
| MR.V.G.BHAT | 200 |
| MR.BANSILAL BUDKI | 200 |
| MR.P.V.CHODANKAR | 200 |
| MR.PAUL COUTINHO | 200 |
| MR.M.H.DABHOLKAR | 200 |
| MR.P.N.DEVI | 200 |
| MR.I.H.DIAS | 200 |
| MR.GAJANAN FALDESSAI | 200 |
| MR.T.T.FERNANDES | 200 |
| MR.MENINO FURTADO | 200 |
| MR.M.G.JADHAV | 200 |
| MR.ARVIND KAKAIYA | 200 |
| MR.V.KARANDIKAR | 200 |
| MR.SHRIHARI K.KHADPE | 200 |
| MR.S.V.KHARANGATE | 200 |
| MR.KODWANI | 200 |
| MR.ULHAS KOSAMBE | 200 |
| MR.VINAYAK S.KULKARNI | 200 |
| MR.P.V.KUTTY | 200 |
| MR.ASHOK MALKARNEKAR | 200 |
| SMT.M.L.MONTEIRO | 200 |
| MR.R.N.MORE | 200 |
| SMT SHOBHANA NAIK | 200 |
| MR.V.M.NAYAK | 200 |
| MR.R.G.NAYAK | 200 |
| MR.LAXMAN PALKAR | 200 |
| MR.GANESH PARAB | 200 |
| MR.BHASKAR S.PETHE | 200 |
| MR.A.K.PONKSHE | 200 |
| MR.S.K.POTE | 200 |
| MR.U.N.SANKOLI | 200 |
| MR.K.SHERLEKAR | 200 |
| MR.P.P.SHETYE | 200 |
| MR.SITARAM SHIRODKAR | 200 |
| MR.R.G.TATHE | 200 |

| | |
|---|---|
| MR.J.S.VAKIL | 200 |
| MR.I.E.WATSA | 200 |
| MR.V.U.KAMAT | 151 |
| MR.MANUEL ABREO | 150 |
| MR.BABANI ADIT | 150 |
| MR.ANIL BORDE | 150 |
| MR.LADU S.CHARI | 150 |
| MR.SUBHASH CHOPDEKAR | 150 |
| MR.IVONE DENIZ | 150 |
| MR.N.H.P.DESSAI | 150 |
| MR.J.B.DIAS | 150 |
| MR.MARIO FEREIRA | 150 |
| CISTA FERNANDES | 150 |
| MR.ANIL GHATKAR | 150 |
| MR.V.GODSE | 150 |
| MR.K.Y.GOPINATHAN | 150 |
| MR.V.S.HERLEKAR | 150 |
| MR.RAVINDRA KARANDE | 150 |
| MR.H.KAVTHANKAR | 150 |
| MR.P.S.KENI | 150 |
| MR.SAGAR KESHKAMAT | 150 |
| MR.B.KRISHNAMURTHY | 150 |
| MR.MOHAN J.NAIK | 150 |
| MR.S.M.MANDREKAR | 150 |
| MR.N.M.MANGESHKAR | 150 |
| MR.K.S.MARATHE | 150 |
| MR.P.M.MASHELKAR | 150 |
| MR.P.M.MHAI KAMAT | 150 |
| MR.ARVIND MHAPNE | 150 |
| MR.DADA N.MORE | 150 |
| MR.Y.B.NAIK | 150 |
| MR.C.V.NAIK | 150 |
| SMT.SUNITA NAIK | 150 |
| MR.TULSIDAR R.NAIK | 150 |
| SMT.SHUBHLAXMI NAIK | 150 |
| MR.P.M.NARKAR | 150 |
| MR.V.N.PALANG | 150 |
| MR.ALEIXO PALHA | 150 |
| MR.B.S.PAWASKAR | 150 |
| MR.J.A.PINTO | 150 |
| MR.VINAYAK K.J.RANE | 150 |
| MR.M.S.RAYKAR | 150 |
| MR.P.K.RAYKAR | 150 |
| MR.H.M.REGO | 150 |
| MR.A.RODRIGUES | 150 |
| MR.BHIKAJI SANZGIRI | 150 |
| MR.D.V.SAVORDEKAR | 150 |
| MR.D.M.SHANBHAG | 150 |
| MR.P.P.SHEVDASSAN | 150 |
| MR.A.SHEVADE | 150 |
| MR.RAMESH SHIRODKAR | 150 |
| MR.AEVIND VELINGKAR | 150 |
| MR.INACIO VIEGAS | 150 |
| MR.PRAKASH R.BAXI | 120 |
| MR.C.N.BENDRE | 101 |
| MR.S.S.DESHPANDE | 101 |
| MR.AJIT KHAIRNAR | 101 |
| MR.S.R.TANAWADE | 101 |
| MR.JUVENAL BRAGANZA | 100 |
| MR.BANSILAL BUDKI | 100 |
| MR.SEBASTIAO D'SOUZA | 100 |
| MR.PARIMAL V.DAVE | 100 |
| MR.JAYANTIBHAI I.DESAI | 100 |
| MR.M.D.DONGRE | 100 |
| MR.L.C.DUBEY | 100 |
| MR.ANTONIO FERNANDES | 100 |
| MR.G.G.GOKHALE | 100 |
| MR.R.D.JAGDALE | 100 |
| MR.R.J.MAHADIK | 100 |
| MR.HASMUKH G.MODI | 100 |
| MR.PRAKASH NAIK | 100 |
| MR.V.C.NAMJOSHI | 100 |
| MR.MANUBHAI L.PATEL | 100 |
| MR.MENINO PEREIRA | 100 |
| MR.V.S.RANE | 100 |
| MR.ARVINDLAL J.SHAH | 100 |
| MR.S.K.VED | 100 |
| MR.RAMESH WANI | 100 |
| R.U.KHAIRNAR | 12 |

## कुछ शेर गौर फरमाइए!

१. आजकल चोर-लुटेरों के
सब तरीके बदलने लगे
संभलना मेरे दोस्तो
वो अब इलेक्शन लडने लगे ।।

२. 'वोट' देनेवालो रहो तुम अब होशियार
जो लूटते है तुम्हें कहकर दोस्त-यार ।।

३. उनके दिल साफ नहीं
नीयत में उनकी खोट है,
वो कहेंगे हम भला करेंगे
लेकिन ये सब झूट है ।।

४. लूट-लूट कर चारा पानी
गॅस और कोयला-खदान
क्या वो नेता बन सकते हैं
इस देश के लिए वरदान? ।।

- **वसंत धुपकर,** पुणे
दूरध्वनी - ०२०-२०२५५४०८

०१२/१३

## व्यक्ति विशेष - *बहुढंगी-बहुगुणी व्यक्तिमत्त्व*

*सौ. उज्ज्वला कुलकर्णी*

*(मुलाखतीतून उलगडलेले विशेष पैलू)*

सौ. उज्ज्वला कुलकर्णी बी. एस्सी. आपल्या असोसिएशनच्या पुणे येथील एक सभासद ज्यांचे नाव आज एकपात्री हास्य प्रयोगामुळे संपूर्ण महाराष्ट्र, गोवा येथे परिचित आहे. मूळच्या त्या मुंबईच्या, नंतर पुण्यात स्थायिक झाल्या. कॉलेजमध्ये असताना वक्तृत्वस्पर्धेत त्यांनी बक्षिसे मिळवली. त्यामुळे सभाधीटपणा आल्याने आणि आत्मविश्वास मिळाल्यामुळे सुरुवातीस त्यांनी कथाकथनाचेही कार्यक्रम केले. उत्तम लेखक, विनोदी कथा, विडंबन गीतकार असल्यामुळे त्यांनी 'हास्यरंजन' हा विनोदी एकपात्री कार्यक्रमाचा प्रथम प्रयोग १९९६ मध्ये केला. आजपर्यंत या कार्यक्रमाचे १८०० प्रयोग झाले. अमेरिका (२००८) न्यूझीलंड (२०११) येथेही त्यांचे कार्यक्रम झाले आहेत. एकपात्री प्रयोग हे एक मोठे आव्हान असते. कारण त्यात सर्व जबाबदारी त्या कलाकारावर असते. प्रयोगाचे सारे यश, अपयश हे त्या कलाकाराचे असते. ही जबाबदारी त्या लीलया पेलतात.

उज्ज्वला कुलकर्णी यांनी 'स्त्री', 'किर्लोस्कर', 'माहेर', 'साप्ताहिक सकाळ' यासारख्या दर्जेदार मासिकांतून आणि केसरी, सकाळ, लोकसत्ता वगैरे वृत्तपत्रांतून लेखन केले आहे. केबल नेटवर्कवरील 'कामगार विश्व' या कार्यक्रमाची निर्मिती, 'कायापालट' या मालिकेचे एकूण १३ भागांचे लेखन तसेच आकाशवाणीसाठी सुद्धा त्यांनी लेखन केले आहे.

महाराष्ट्र सरकारचा 'गुणवंत कामगार' पुरस्कार, 'गुणवंत युवा', 'राजीव गांधी', 'श्रमगौरव', 'श्रमभूषण', 'सरस्वती केळकर' आणि 'क्रियावंत' पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांच्या त्या मानकरी आहेत. भारत सरकारच्या 'सूचना आणि प्रसारण' मंत्रालय, नवी दिल्ली याजकडून विनोदी कार्यक्रमांसाठी त्यांना 'ए' ग्रेड कलाकार म्हणून राजमान्यता मिळाली. नुकताच त्यांना 'बालगंधर्व' पुरस्कार हा कलाक्षेत्रातील एक अत्यंत मानाचा पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

एकपात्री विनोदी कार्यक्रम करणारे पुरुष कलाकार बरेच आहेत. परंतु स्त्री कलाकार या क्षेत्रात नाहीतच असे म्हटले तरी वावगे होणार नाही. त्यामुळे त्यांच्या एकपात्री विनोदी कार्यक्रमाला खेडोपाडी सुद्धा मागणी असते. त्यांच्या कार्यक्रमाचे एक वैशिष्ट्य म्हणजे समोरचा प्रेक्षक वर्ग पाहून त्या दृष्टीने त्या आपल्या कार्यक्रमाचे सादरीकरण करतात आणि प्रेक्षकांना मनमुराद हसवतात. ग्रामीण भागात कार्यक्रम असला तर त्या अस्सल ग्रामीण भाषेत कार्यक्रम सादर करून ग्रामस्थांना भरपूर हसवतात, आनंद देतात.

समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो, ही जाणीव ठेवून त्या या अनोख्या छंदाची जोपासना करीत आहेत. त्यांच्या या कार्यक्रमात विनोदी कथा, कविता विडंबन, किस्से, प्रसंग, घटना यांचा अनोखा संगम असतो. अंध, अपंग, वृद्धाश्रम, अनाथाश्रम, मूकबधीर यांच्यासाठीही त्या कार्यक्रम करतात आणि विशेष म्हणजे अश्या कार्यक्रमाचे मानधन त्याच संस्थेला त्या देणगी म्हणून देतात. पूना हॉस्पिटलमध्ये 'हार्ट पेशंट' साठी मुद्दाम त्यांचा एकदा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमास सर्व पेशंटनी आपले आजारपण विसरून उत्स्फूर्तपणे हसून दाद दिली. कृत्रिम हास्यापेक्षा असे उत्स्फूर्त हसणे केव्हाही प्रकृतीस हितकारक असते असे त्या मानतात.

कार्यक्रमासंबंधी एखादी विशेष आठवण आहे का? हे विचारल्यावर त्या म्हणाल्या, ''एकदा त्यांच्या कार्यक्रमाला एक विधवा बाई आल्या होत्या. त्यांना मूलबाळ नसल्यामुळे पतीनिधनानंतर त्या एकट्याच राहात होत्या. कार्यक्रम संपल्यावर त्या स्टेजवर आल्या आणि माझे अभिनंदन केले. गेल्या तीन वर्षात त्या हसणे विसरल्या होत्या. पण या कार्यक्रमामुळे मी मनमुराद हसून घेतलं असे म्हणून मला शुभाशीर्वाद दिले.''

आनंद हा मानवी जीवनाचा आत्मा आहे. धकाधकीच्या जीवनातील सुख-दु:ख, चढ-उतार, ताण-तणाव होत असताना त्यापासून या विनोदी कार्यक्रमामुळे थोडा वेळ तरी माणूस ते सर्व विसरतो व आनंदी राहतो. ''त्यामुळे या ताणतणावाच्या जीवनातून मुक्त होण्यासाठी मला स्वत:ला हसायला आणि दुसऱ्यांना हसवायला फार आवडते'' असे त्या आवर्जून सांगतात.

कार्यक्रमांचे वेळापत्रक सांभाळताना प्रथम घरातील वेळापत्रक सांभाळणाऱ्या सौ. कुलकर्णी एक उत्तम गृहिणी आहेत. या विषयी अधिक विचारता त्या म्हणाल्या, ''माझ्या मुलाच्या १२ वी च्या परीक्षेदरम्यान त्यांच्या विनोदी कार्यक्रमाला आलेली ८-१० आमंत्रणे त्यांनी विनम्रपणे नाकारली.

सौ. कुलकर्णी यांनी त्यांच्या 'हास्यरंजन' या एकपात्री विनोदी कार्यक्रमाबरोबर 'हास्यबहार' नावाचा एक नवीन कार्यक्रम तयार केला आहे. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य सांगताना त्या म्हणाल्या, 'हा कार्यक्रम मी स्वत:च लिहिला असल्यामुळे 'हास्यबहार' हा कार्यक्रम एकदम वेगळा आहे. यात 'हास्य रंजन' कार्यक्रमामधील कोणत्याही विनोदाची, प्रसंगाची, किस्स्यांची, विडंबनगीताची पुनरुक्ती नाही. मी स्वत:च लेखन केल्यामुळे पुनरुक्ती कटाक्षाने टाळली आहे. हा नवा कार्यक्रमही रसिकांना भरपूर हसवून आनंद देईल असा त्यांना विश्वास वाटतो.

स्वत: हसत, आनंदी राहून दुसऱ्यांना हसवत, आनंद देण्याचा वसा अंगिकारलेल्या सौ. उज्ज्वला कुलकर्णी यांचे हार्दिक अभिनंदन व त्यांच्या आनंदमय 'हास्यरंजन', 'हास्यबहार' या कार्यक्रमांना लाख लाख शुभेच्छा.

*सौ. उज्ज्वला कुलकर्णी, पुणे,*
*संपर्क - ९८९०९४६६८४*

- प्रभाकर गुपचूप, पुणे,
भ्रमणध्वनी - ९८८१५७९४९९

पुस्तक-परीक्षण

## 'सहज सुचलं म्हणून'

पुण्यातील आपले एक सभासद श्री. शरद महाबळ यांचे 'सहज सुचलं म्हणून' हे पुस्तक ४ ऑक्टो. २०११ रोजी प्रसिद्ध झाले. पुस्तक वाचनानंतर त्यांच्या प्रामाणिक विचारांची मनात प्रतिक्रिया उमटते. सर्वसामान्य वाचकांना भावतील अशा कविता तसेच त्यांचे मराठी आणि इंग्रजीतील लेख, यांचा संग्रह या पुस्तकात आहे.

पुस्तकातील मनोगतामध्ये लेखक म्हणतात, ''मुक्या भावनांना शब्दरूप करण्याचे थोडे तरी सामर्थ्य माझ्यात आहे, असे वाचकांना जाणवलं तर माझ्या भावनिक कळ्यांना आणि फुलांना नक्कीच फुलोरा येईल.'' सदर पुस्तक नुसते चाळले तरी लेखकाची अपेक्षा पुरेपूर पूर्ण होतेच. त्यातील बरेचसे लिखाण हे अगदी सहजसहज लिहिले गेले आहे. वेळ मिळेल तिथे अगदी प्रवासातही आणि हे उत्कृष्ट लिखाण झालेले आहे.

त्यांनी स्वत:च्या विचारांना अगदी प्रामाणिकपणे शब्दरूप दिलेले आहे. पुस्तकातील १४३ पानावरील 'साहित्य संमेलन' ही कविता वास्तवातील संमेलनातून आढळून येणाऱ्या रटाळ कार्यक्रमांबद्दलची नाराजी योग्य शब्दात व्यक्त करते. त्या नाराजीशी वाचकही नकळत सहमत होतो.

याशिवाय 'पण लक्षात कोण घेतो?' (पृ. ८८) 'मुलगी दाखविण्याचा कार्यक्रम (पृ. ४६) 'मुलीची यशोगाथा' (पृ. ९०) 'मंदार फाटक' यांना शिक्षक दिनानिमित्त (पृ. १६७) 'अधिक महिन्याचे वाण' या आणि अशा अनेक कविता त्यांच्या अभिजात कवित्वाची साक्ष देतात.

तसेच पुस्तकातील 'मला उमजलेले ती. बाबा व ती. सौ. बाई (पृ. १९२) गुरुपौर्णिमा श्रद्धांजली वगैरे लेख तर उत्तम कलाकृती ठरतील.

श्री. महाबळ यांना त्यांच्या जीवनात, विविध प्रकारच्या बऱ्या-वाईट अनुभवातून जावे लागले. बँकेच्या नोकरी काळात वेगवेगळ्या जबाबदाऱ्या आणि आव्हाने पेलावी लागली. या सगळ्याचे प्रतिबिंब त्यांच्या लेखनातून दिसते आहे. त्यांचे इंग्रजी लेखही, त्यातील विषयाची मांडणी आणि स्वत:चे विचार पटवून देता येतील, इतके परिपूर्ण आहेत. निकटवर्तीय, कुटुंबीय, स्नेही आणि बँकेतील सहकारी यांच्याबद्दल लिहिताना त्यांच्या प्रगल्भतेची चुणूक आणि कृतज्ञतेची जाणीव दिसून येते.

आपल्या सभासदांनी हे पुस्तक जरूर वाचावे आणि लेखकाच्या प्रामाणिक प्रयत्नांना, भावनांना दाद द्यावी.

६३/१३ **- अशोक वाकचौरे**, पुणे
भ्रमणध्वनी - ९९२२०६८९८७

## स्त्रीभृणहत्या

अशा थिजल्या डोळ्यांनी माझ्याकडे पाहू नको ।
तुला कुणी दोष देईल ह्याची पर्वा करू नको ।
लक्षात घे! घरातले बाहेरचे, आजूबाजूचे काय म्हणतील ।
ह्याची चिंता करायचं तुला कारण नाही ।
मलाही त्याची जराही फिकीर नाही ।
मुलगा होणार की मुलगी होणार
ह्याचं निदान शोधण्याची जराही गरज पडणार नाही ।
नियतीनं, पदरात दान दिलंय ।
ते पाडून टाकता येणार नाही ।
धाडस करून सांग सर्वांना ।
घराण्याला मुलगाच वारस म्हणून हवाय ।
असा अट्टाहास करू नका ।
उद्या तो कसा घडेल ! काय दिवे लावेल ।
ह्याचं भाकीत, मला, तुला आजूबाजूच्या इतर सर्वांना ।
आत्ताच, ह्या घडीला सांगता येईल का?
मग, मुलगी झाली! तर तुम्ही का तिला ।
नाहक कमी लेखता ।
आणि म्हणूनच, आधीच तपासून घ्यायला ।
कधीही माझी संमती असणार नाही ।
अशा थिजल्या डोळ्यांनी माझ्याकडे पाहू नको ।
तुला कोणी दोष देईल ह्याची पर्वा करू नको ।
योगायोगानं मुलगीच असेल तर ।
गर्भपात मी मुळीच करवून घेणार नाही ।
विसरू नको! तुला जन्म देणारी, एक स्त्री होती ।
आताही, तुला बाळ देणारी, ही ही एक 'स्त्री' आहे ।
हे सत्य कुणालाही टाळता येणार नाही ।
तुला पटत नसेल तर जुळलेले सर्व धागे तोडून
माझ्या मुलीला घेऊन तुझ्यापासून दूर कुठेतरी निघून जाईन।
आणि तिथूनच
स्त्रियांचा संपूर्ण नि:पात होण्यापूर्वी ।
हेच पोटतिडकीने ओरडून सांगत राहीन ।
सैरावैरा भटकत असणाऱ्या
त्या नालायक नरांना, सर्वात आधी ।
भीक मागीत, गल्लो गल्ली ।
फिरत राहावं लागेल
तुम्हा सर्वांना
हेच केविलवाणे लाचार शब्द उच्चारीत ।
कुठे एखादी तरी, 'मादी' दिसते का हो मादी।

०८५/१३ **- नरेन चव्हाण,** कुर्ला
मो. - ९३२४९७३३८८

# पुस्तक परीक्षण

आपले धुळे येथील सभासद श्री. साहेबराव देसाई आपल्या संघटनेचे उपाध्यक्ष, औरंगाबाद विभागाचे अध्यक्ष यांनी दिनांक २७ ऑगस्ट २०१३ रोजी धुळे येथील झालेल्या आपल्या ३३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत 'निमित्त-लेकीच्या भेटीचे' ह्या नावाचे स्वलिखित छोटेखानी पुस्तक आलेल्या सभासदांना भेट म्हणून दिले.

श्री. देसाई याचे संपूर्ण जीवन अत्यंत संघर्षमय, धडाडीचे टक्केटोणपे खाऊन तयार झालेले आहे. बँक, युनियन, असोसिएशन, इतर सामाजिक संस्था इ. मध्ये सतत कार्यरत राहून, विविध गुणांनी समृद्ध झालेले आहे. त्यांची साहित्य प्रांतातील मुशाफिरी राहिली होती ती त्यांनी या पुस्तक लेखनाने सुरू केलेली दिसते.

लंडन येथे स्थायिक असलेल्या एक डॉक्टर व दुसरी इंजिनिअर या मुलींना व जावयांना भेटण्यासाठी ते लंडन येथे पत्नीसोबत २००६ मध्ये गेले होते. लंडनला येण्याचा आग्रह मुलींनी धरला. त्यांनीच सर्व जाण्या येण्याच्या तारखा, तिकीट बुकींग, इंग्लंड मधील स्थल दर्शन ठरविले. श्री व सौ. देसाई यांची परवानगी गृहीत धरून या दांपत्यास लंडनला भेट देण्यास भाग पाडले.

एक प्रकारे श्री. देसाई यांच्या अति-व्यस्त जीवनातून त्यांना सक्तीची विश्रांती घेण्यास भाग पाडले. तेथील वास्तव्यात त्यांनी मग रोजनिशी लिहून काढली. काय आहे या रोजनिशीत? म्हटलं तर प्रवास वर्णन, म्हटलं तर गत जीवनाचा मागोवा, लेकी-जावयांसोबत काढलेले आनंदाचे दिवस. लंडन-इंग्लंड वासियांचे जीवन, त्यांच्या जीवनपद्धतीची आपल्या जीवनपद्धतीची तुलना, ओघाने आलेल्या स्वजीवनातील सुख-दु:खांच्या आठवणी, लहानपणाच्या आठवणी, शेतकरी माता-पित्यांचे कष्ट, त्यांचे ऋण. एकत्र कुटुंबातील बऱ्या-वाईट घटना, गावाकडील बालमित्र, जीवन संगीनीने जीवनात केलेली साथ, मानसिक आधार, मुलींनी मिळविलेले उत्तुंग यश, हे सर्व फक्त ४१ दिवसांच्या रोजनिशीत उतरलेले मनोगत. जे मनात आले ते शुद्ध हेतूने कागदावर उमटले. त्यात कोठेही मोठे साहित्यिक लिखाण करीत असल्याचा अभिनिवेश नाही. त्यांचा शून्यातून समृद्धीकडे झालेला जीवनप्रवास, त्यामुळे त्यांना तृप्त जीवनाचा मिळालेला आनंद! पुस्तक वाचीत असताना सतत जाणीव होत होती की लेखक बायकोचे बोट धरून त्यांच्या सोबत त्यांच्या जीवन प्रवाहात सामील करून घेत आहे. साहित्य प्रेमींनी हे पुस्तक जरूर वाचावे असे आहे. श्री. साहेबराव देसाई यांना त्यांच्या पुढील लेखन प्रवासासाठी शुभेच्छा!

**- वसंत धुपकर**, पुणे. दूरध्वनी- ०२०-२०२५५४०८

# उत्तरे

असोशीच्या कंठामधुनी
तानांची किरणे निघाली
भावनांचे रंग लेवूनी
सुरांची फुलपाखरे उडाली.....

मुक्त सुरांना साथ देते
मधुर शीळ वाऱ्याची
मनीच्या चंचल विचारांना
जणू गती चपळ पाऱ्याची
स्वरांतला हुंकार कसा हा
गगनाला गवसणी घाली .........

हळूच स्पर्शूनी फुलाफुलांना
सूर फुलविती रंग फुलोरा
सुरांमधला गंध लेवूनी
केशराचा फुलत पिसारा
दिव्य गंधाने त्या अवघी
बाग लज्जित झाली........

शब्द होते ओठी अडले
सुचत नव्हते कैसे सांगावे
एक मागणे मुक्या मनाचे
कुणाकडे कैसे मागावे
आर्ततेच्या त्या पत्राला
उत्तरे स्वरांनी दिधली........

**७६/११** **- सौ. उज्वल र. ब्रह्मांडकर**

## आपली आवड

''तू काळजी करू नको सुमे - तुझ्या लेकीसाठी असा फक्कड नवरा शोधून देते की, सगळे जण म्हणतील की व्वा!''

''नको नको! मावशी, तुम्ही माझ्या लेकीचं लग्न जमवण्याच्या भानगडीत पडू नका प्लीज!''

''अगं, भानगड कसली म्हणतेस? माझ्या अनुभवाचा फायदा करून घे. नको काय म्हणतेस?''

''घेतला असता गं तुझ्या अनुभवाचा फायदा पण माझ्या सगळ्या मैत्रिणी म्हणतात - सुमे, तुझ्या मावशीसारखं करू नको. तिचं लग्न तिनेच जमवलंय ना- काय पण ध्यान निवडलंय!''

०६४/१३ **- मधु रानडे** नाशिक
भ्रमणध्वनी - ९८२२१४८०४

ललित

# दरवाजे मनाचे

नेहमीसारखीच त्या दिवशीही मी भाजी आणायला मंडईत गेले होते. ताज्या रसरशीत भाजीच्या पिशव्या सांभाळत आज व्हेजिटेबल पुलाव करण्याचा बेत आखत माझ्याच नादात चालले होते. एवढ्यात 'निशा, ए निशा!' अशी हाक कानावर पडली. मी चमकून इकडे-तिकडे पाहिले तर राजश्रीच्या सासूबाई जड भाजीच्या पिशव्यांचे ओझे सांभाळत माझ्याचकडे येत होत्या. त्या चांगल्याच दमल्या होत्या. 'काय हो काकू, आज तुम्ही भाजी आणायला आलात! राजश्री गावाबिवाला गेली आहे की काय? नाही गं! आहे की घरातच. अलीकडे तिचे काय बिनसले आहे काही कळत नाही. सारखी चिडचिड करत असते. श्रीकांतशीही तिचे सतत खटके उडतात. तो बिचारा ऑफिसमधून दमून भागून घरी येतो तर ही तलवार पाजळून तयारच असते. निमिष-निखिलासुद्धा वैतागली आहेत गं! ना त्यांचा अभ्यास धड होतोय ना वेळेवर नाष्टा-जेवण मिळतंय. यांच्याही बी.पी. च्या दुखण्याने पुन्हा उचल खाल्लीय. घरातलं वातावरण पार ढवळून गेलंय. काकू, मी आणि रजनी १-२ दिवसात येतो, तुमच्या घरी राजश्रीची समजूत घालायला. तुम्ही काही काळजी करू नका. राजश्रीच्या सासूबाईंची कशीबशी समजूत घालून मी घरी आले. पुलाव करण्यासाठी मटार सोलत होते पण मनात राजश्रीचेच विचार घोळत होते. एवढी हुशार सुगरण राजश्री जणू उत्साहमूर्तीच. एवढी वर्षे पोष्टातील नोकरी सांभाळून संसार केला पण सदा आनंदी, सदाफुलीच. महिन्याच्या पहिल्या बुधवारी भिशीला यायची ना, तेव्हा उत्साहाने नुसती ओसंडून वाहत असे. तिच्या सासूबाई निमिष-निखिलाला चांगले सांभाळत होत्या. त्यांच्या मदतीला तिचे सासरेही होतेच. पण वयपरत्वे दोघेही थकले. त्यामुळे राजश्रीला नोकरी सोडावी लागली. राजश्रीने मोठ्या नाखुशीने ही तडजोड मान्य केली.

दुसऱ्या दिवशी मी व रजनी राजश्रीकडे गेलो. तिच्या सासूबाईंनी खुणेनेच तिच्या खोलीकडे बोट दाखवून अजूनही स्फोटक परिस्थिती असल्याचे सुचविले. आम्हाला बघताच राजश्री कसनुसं हसली. 'काय गं! काय दशा करून घेतली आहेस.' हीच कां ती अवखळ, अल्लड राजश्री! ओळखू पण येत नाही. तरीही ती काहीच बोलेना. नुसती मुसमुसत राहिली.

''हे बघ राजश्री तुझ्या मनात काय सलतंय ते तरी मोकळेपणाने बोल.'' रजनी तिच्या पाठीवरून हात फिरवत आपलेपणाने म्हणाली. जवळच्या तांब्यातले पाणी भांड्यात ओतून तिच्या तोंडाशी नेले, घोट दोन घोट पाणी प्यायली. क्षण दोन क्षण जाऊ दिल्यावर मी म्हटले, ''अशी मनातल्या मनात नको गं त्रास करून घेऊ. तब्येतीवर बघ किती परिणाम झाला आहे. अगदीच रया गेली आहे तुझी. तुला माहिती आहे का? पावसाळ्यात धरणं भरली की, त्याचे दरवाजे उघडून पाणी सोडावे लागते. नाहीतर धरणं फुटण्याचा धोका असतो. तसेच माणसाचे पण आहे. मनाचे दरवाजे उघडल्याशिवाय अंत:करण मोकळे होत नाही. शरीराच्या आरोग्याइतकेच मनाचे पण आरोग्य महत्त्वाचे आहे. शरीराची ही इमारत निरोगी, निकोप मनाच्या भक्कम पायावरच उभी राहू शकते.''

हे ऐकून राजश्री ओक्साबोक्शी रडू लागली. आम्हीही तिला थोडावेळ तसेच रडू दिले. रडून रडून शांत झाल्यावर ती हळूहळू बोलू लागली. इतकी वर्षे नोकरी केल्यावर नोकरीचा राजीनामा दिल्यावर सुरुवातीचे १-२ महिने बरे गेले. नंतर हळूहळू श्रीकांत ऑफिसच्या विश्वात रमला. सासरे त्यांच्या मित्रमंडळीत तर सासूबाई कीर्तन-पुराणात रमल्या. मुलांना तर त्यांचे स्वतंत्र विश्व होतेच. घरचे कामधाम आटोपल्यावर राजश्रीला अगदीच एकटे एकटे वाटायचे. वाचून वाचून तरी किती वाचणार आणि टी.व्ही. तर किती बघणार? हळूहळू तिला नैराश्याने घेरले. भिशीला यायचेही तिने बंद केले. सुरवंटासारखा कोश करून ती त्यातच गुरफटून राहू लागली.

मी व रजनीने तिला या कोशातून बाहेर पडण्यासाठी परोपरीने विनवले. अगं, तुझा आवाज एवढा सुरेख आहे. तू गायनाचा क्लास लाव नाहीतर एवढी वर्षे तुझा हा छंद राहून गेला होता ना! आता तुला वेळही भरपूर असतो. मनात कुढत बसण्यापेक्षा बघ प्रयत्न करून. कशीबशी समजूत घालून आम्ही घरी आलो.

यातच ५-६ महिने गेले. अशाच आम्ही सुवर्णाकडे भिशीला चाललो होतो. आमचा आमच्या डोळ्यावर विश्वास बसेना. समोरून राजश्री येत होती. तशीच पहिली होती तशीच. सतेज-टवटवीत. मध्यंतरी आलेल्या चक्रीवादळाचा मागमूसही कोठे दिसत नव्हता.

'काय गं! कोठे चाललीस?' मी किनई ! ' मंजूळ आवाजात किणकिणत राजश्री म्हणाली, ''जोशी बाईंकडे गायनाच्या क्लासला चाललेय, बरं येऊ? आधीच उशीर झालाय. सवडीने भेटेनच तुम्हाला. तुम्ही दोघींनी तर मला नवसंजीवनी दिलीत आणि ती झपाझप पावले टाकत निघूनही गेली.

आम्ही समाधानाचा नि:श्वास टाकला.

५८/१३

**- सौ. सुगंधा रामचंद्र जोशी,**
सातारा

**Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008**
**SSPO Pune under Postal Concession Register No. PNCW/M-144/2011-2013 Dated 10.12.2010**
**Permission to Post without Prepayment No.: WPP-217 at Market Yard P.S.O. on 25th of each Month and published on 25th of the month**

## नगण्य - गण्य

लांबी-रुंदी-उंचीत बसत नाही
म्हणून हिणवू नका बिंदूला
मध्य-भागी स्थान मिळवितो,
कितीही आकार असो वर्तुळाला
लहान मोठे लगाम, मिळता त्याच्या हाताला
सगळी वर्तुळे फिरतात, त्याच्याच भोवतीला
त्रिकोण, चौकोन, षट्कोन आकार कितीही वेगळे
बिंदूचे स्थान मात्र नेहमीच अढळ आगळे
नका करू भेद भाव मोठे आणि लहान
ज्याचे त्याचे मोल आहे त्याच्या परीने महान

७९/१३- **सौ. स्नेहल अच्युत सातार्डेकर,** बोरीवली
फोन - २८९७२६०५

## इश्काचे अंगार

अवेळी आलेली ती सर पावसाची
चिम्ब चिम्ब मजला भिजवूनी गेली
कोवळ्या नाजूक देहावर माझिया
मऊशार हिरवळ पसरूनी गेली

पावसाच्या त्या, नशिल्या पाण्याने
यौवन माझे बहरूनी आले
गच्च वस्त्रांची बंधने झुगारून
कळे कोवळे जणू मोकाट सुटले

तुझी अधाशी नजर त्यावेळी
सौंदर्य ओले माझे पीत होती
त्या विखारी नजरेने जादू केली
इश्काचे अंगार चेतवून गेली

**४६/१२** **-दिलीप अ. रेडकर,**
गोरेगाव, मुंबई

**सूचना :** १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही. २) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी. संपर्क दूरध्वनी क्रमांक : (०२०) २४३३२१४१

**Thane Office Address**: A/5 Swami Siddharth CHS Ltd., S V Road, Naupada, Thane 400 602. Tel. No : 25446837
Timings : On Tuesday & Friday between 4 pm to 6 pm.

**Printed Matter**

***If Undelivered Please Return to :***
**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune 411030. Ph: 24332141**

To,

**Publisher** – Shri. Ramchandra Narayan Lalingkar, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri.Chandrashekhar Digambar Joshi, Director, Shree J Printers Pvt.Ltd., at 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune – 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.